प्रेस नोट दि. २४/०३/२०१७

**गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाने फिनिक्स मॉलसमोर नगर रोडवर चरस अंमली पदार्थ विक्री करणेकरीता आलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ५ तरुणांना स्विफ्ट कारसह अटक करुन १३,८०,०००/- किं.रु चे चरस जप्त करण्यात आले**

---

दिनांक २३/०३/२०१७ रोजी दरोडा प्रतिबंधक पथकातील पोहवा १८३४ जगताप यांना त्यांचे बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, पुणे-नगर रोडवरील फिनिक्स मॉलचे समोर नगर जिल्ह्यातील काही तरुण त्याचे स्विफ्ट कार क्र एमएच-१२-जीएफ-०२१० या गाडीतुन चरस नावाचा अंमली पदार्थ विक्री करणेकरीता ते पुणे येथे येणार आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळताच दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कदम यांनी त्याचे अधिनस्त पोलीस कर्मचाऱ्यांना सुचना देऊन फिनिक्स मॉलसमोर पुणे नगर रोड पुणे येथे सापळा रचुन रात्रौ २२.४५ वा. छापा टाकला व चरस अंमलीपदार्थ विक्रीकरणे करीता नगर येथुन आलेल्या ५ तरुणांना त्यांचे स्विफ्ट कारसह ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांची नावे १) समाधान दत्तु गोरे, वय २५ वर्षे, रा. मु.पो. महीम, ता. सांगोला जि सोलापुर २) असाराम गणपत गोपाळघरे, वय २८ वर्षे, रा. मु. नागोबाची वाडी, पोस्ट खर्डा, ता. जामखेड जिल्हा अहमदनगर, ३) वैजनाथ रामा सांगळे, वय २९ वर्षे, रा. मु. आनंदवाडी, पोस्ट नायगाव ता. जामखेड, जि. अहमदनगर ४) भास्कर दत्तू गोपाळघरे, वय २७ वर्षे, रा. मु. नागोबाची वाडी, पो. खर्डा, ता. जामखेड जिल्हा अहमदनगर ५) फिरोज इकबाल पंजाबी, वय ३७ वर्षे, मु.पो. खर्डा, ता. जामखेड जिल्हा अहमदनगर अशी असुन ते सर्वजण अहमदनगर जिल्ह्यातील रहिवाशी आहेत त्यांचेकडुन चरस नावाचे अंमली पदार्थ असलेल्या ३ किलो ४५० ग्रॅम कि.रु. १३,८०,०००/- तसेच त्यांनी वापरलेली स्विफ्ट कार क्र एमएच-१२-जीएफ-०२१० कि.रु. ६,००,०००/- असा सर्व मिळुन १९,८०,०००/- चा माल जप्त करण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द विमानतळ पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं १२६/२०१७ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८, २०(ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील सर्व आरोपी विमानतळ पोलीस ठाणेचे पोलीस कस्टडीत आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, सो. गुन्हे श्री. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त सो. श्री पी.आर.पाटील, स.पो.आ. गुन्हे १ श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, पोलीस कर्मचारी सहा.पो.फौज. यशवंत आंब्रे, दिपक निकम, संजय दळवी, शैलेंद्र जगताप, राहुल घाडगे, संतोष पागार, निलेश पाटील, अजय भोसले, हरिभाऊ रणपिसे, विनोद साळुंके, परवेज जमादार, प्रमोद गायकवाड, महेश कदम, मल्लिकार्जुन स्वामी, सचिन गायकवाड, चेतन गोरे, विठ्ठल बंडगर, धनाजी पाटील यांनी केली आहे.

